महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्‌घाटन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उद्भवणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-०६२६ /प्र.क्र.१३४/१८-स

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२

दिनांक:- २०.०७.२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

भारत टॅक्सी' (Bharat Taxi) हा सहकार मंत्रालयाद्वारे 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ' (NCDC) आणि सात प्रमुख राष्ट्रीय सहकारी संस्थांच्या सहकार्याने राबविला जाणारा, सहकारावर आधारित आणि नाविन्यपूर्ण गतिशील (mobility) उपक्रम आहे. 'भारत टॅक्सी' मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी सेवा पुरवते, जे प्रवाशांना थेट चालकांशी जोडते. महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्‌घाटन कार्यक्रम मा. मुख्यमंत्री आणि मा. केंद्रीय सहकार राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत दि. २३.०७.२०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सदर नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उद्भवणाऱ्या खर्चास अंदाजे रु. २५.०० लाख (अक्षरी - रु. पंचवीस लाख फक्त) ला प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्‌घाटन कार्यक्रम मा. मुख्यमंत्री आणि मा. केंद्रीय सहकार राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत दि. २३.०७.२०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सदर नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उद्भवणाऱ्या खर्चास अंदाजे रक्कम रु. २५.०० लाख (अक्षरी-रु. पंचवीस लाख फक्त) ला या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनार्थ येणारा खर्च विभागाच्या १०५, माहिती व प्रसिध्दी, (०१) माहिती व प्रसिध्दी (०१)(०१) सहकार विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची जाहिरात व प्रसिध्दी (कार्यक्रम) २६, जाहिरात प्रसिध्दी (२४२५ २५९८) या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ या वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय विअप्र -२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७ (२) “अ” नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ जुलै, २०२४ व दि. १२ फेब्रुवारी, २०२५अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७२०१७५२०२१२४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TEJAL RAMESHRAO PARDE

Digitally signed by TEJAL RAMESHRAO PARDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=019d779a48258636496c1fec0492fd7daa52f3f2c329798028660b47fed6130a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89128237A4F41B9735DD61762BBCE33E4A0AF82C2F7EAB2825CB61E62611D4AB, cn=TEJAL RAMESHRAO PARDE
Date: 2026.07.20 17:52:51 +05'30'

(तेजल र. पारडे)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई.
४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. अपर निबंधक तथा सह सचिव (कार्या. १८स) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव(अर्थसंकल्प) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
११. निवड नस्ती, कार्या-१८स.